**मिरा-भाईंदर ,वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**सायबर गुन्हे शाखा**
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट :- ३२१ दिनांक – १७/११/२०२१

## ऑनलाईन फसवणुक झालेली रक्कम पुन्हा तक्रारदार यांना परत मिळवुन देण्यात सायबर गुन्हे शाखेस यश

मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या श्रीमती कपटकर यांना ऑनलाईन चदंन स्टिक खरेदी करण्याकरीता सर्फींग करीत असताना त्यांचे मोबाईल वर इंडीया मार्टचे कस्टमर केअर मधुन बोलत असल्याचे भासवुन गुगल पे द्वारे ४०,०००/- रुपयाची फसवणुक करण्यात आली. सदर तक्रारदार महीला यांनी सायबर गुन्हे शाखा येथे दिनांक १६/११/२०२१ रोजी तक्रार दिली.

सायबर गुन्हे शाखेने तक्रार प्राप्त होताच तात्काळ चौकशी सुरु करुन महिला तक्रारदार यांची फसवणुक झालेली रक्कम वापरुन फ्लिपकार्ट येथे डिजिटल व्हॉऊचर खरेदी करण्यात आल्याचे निष्पन्न केले, तसेच सायबर गुन्हे कक्षातील अधिकारी/अंमलदार यांनी फ्लिपकार्ट वॉलेटचे नोडल अधिकारी यांचेशी तात्काळ संपर्क साधुन सदरची फसवणुक रक्कम रिफंड मिळणेकरीता पत्रव्यवहार केला असता सदर फसवणुक झालेली संपुर्ण रक्कम अवघ्या ०२ तासाच्या आत तक्रारदार महीलेस मिळवुन देण्यात आलेली आहे.

**मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे कस्टमर केअर कर्मचारी असल्याचे सांगून कोणी संपर्क साधल्यास कोणतेही रिमोट असिस्टंट सॉफ्टवेअर डाऊनलोड करु नये अथवा क्युआर कोड स्कॅन करु नये. अशा प्रकारची फसवणुक झाल्यास तात्काळ आपले नजीकच्या पोलीस ठाणेस अथवा सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. जेणेकरुन आपली फसवणुक झालेली रक्कम परत मिळवुन देण्यास व अशा प्रकारास आळा बसविण्यास मदत होईल.**

सदरची कामगिरी डॉ.श्री.महेश पाटील,पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.अमोल मांडवे, सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.सुजितकुमार गुंजकर, पोउपनिरी संतोष भिसे, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर,पोशि/२०७२ इलग,पोशि/१८१२ प्रविण आव्हाड, मपोशि/ पल्लवी निकम, मपोशि/सुवर्णा माळी यांनी उत्कृष्टरित्या पार पाडली आहे.

- सायबर गुन्हे शाखा संपर्क क्रमांक :- ०२२-२८११ ०१३५
- सायबर गुन्हे शाखा व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्रमांक :- ९०० ४८८ ०१३५
- सायबर गुन्हे शाखा ई-मेल आयडी :- **cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**

---००---